झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पहिला मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११०१६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/२८८८ /२०२५
दिनांक : १२/११ /२०२५.

## झोपडपट्टी निर्मूलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह कलम १२ अन्वये अंतिम आदेश)**

प्रस्तावना -

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.३१०/१, ३१०/२, सि.स.नं.४७५३, ४७५४ आणि ४७५५, आण्णासाहेब मगरनगर, चिंचवड, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ **६६००.०० चौ.मी.** या महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीच्या जागेवर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील विकास नियंत्रण नियमावली, २०१४ यातील नियम क्र.एस.आर.४(५) च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दि.२९/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सदर क्षेत्रातील झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत दि.०८/०८/२०२२ रोजी तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण २८९ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र १९३, अपात्र ५३ व बिगर निवासी पात्र २, अपात्र १२ या प्रमाणे एकुण १९५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत.

(४) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.१४/१२/२०२१ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर २३-२९, २०२१ मध्ये पृष्ठ क्र. ९ व १० वर तसेच वृत्तपत्रात अनुक्रमे दि.१६/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा रितीने प्रत्यक्ष जागेवर दि.१६/१२/२०२१ रोजी डकविण्यात आलेला आहे.

(५) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) अन्वये झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन दि.१२/१०/२०२३ रोजी पारित करणेत आली आहे. सदरची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी दिनांक ऑक्टोबर २६ ते नोव्हेंबर १, २०२३, मध्ये पृष्ठ क्र. ११ व १२ वर प्रसिध्द करणेत आली आहे तसेच दि.२१/१०/२०२३ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली असून

सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.२६/१०/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(६) उक्त ३(ड) पूर्वसूचनेविरुध्द श्री.रामाआधार रघुनाथ यादव व इतर ४ आणि रफिक आलम शेख व इतर ११ यांनी मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई यांचेकडे अनुक्रमे अपिल क्र.३२/२०२४ व अपिल क्र.३३२/२०२५ दाखल केले होते. सदर अपिले दि.२८/१०/२०२५ रोजी मा. शिखर तक्रार निवारण समिती यांनी निकाली काढले आहेत.

तसेच, विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दाखल रिट याचिका क्र.१११९६/२०२४ मध्ये दि.१९/०८/२०२४ अन्वये निर्णय दिला असून सदरची याचिका निकाली काढली आहे.

(७) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही.

(८) विकसक मे.आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणा-या सर्व झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था झोपडीधारक स्वत: करणार असून आम्ही त्यांना दरमहा भाडे देणार असलेबाबत रु.१००/- च्या मुद्रांकावरील हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. यासंदर्भात प्राधिकरणाने प्रति झोपडीधारक प्रति महा रू.६१८८/- इतके भाडे निर्धारित केले आहे. प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१०, दि.१२/१२/२०२३ व शुद्धिपत्रक क्र.१, दि.१४/०२/२०२५ नुसार एक वर्षाचे भाडे अग्रीम स्वरुपात व त्यानंतर पुनर्वसन सदनिकेचा ताबा देईपर्यंत प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस पुढील-एक वर्षाचे आगावू भाडे सर्व पात्र झोपडीधारकांना विकसकाने अदा करणे अनिवार्य आहे.

(९) सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती/झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३(ड) सह कलम १२ (१) अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

(१०) मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई यांनी उक्त दाव्यामध्ये देणेत आलेल्या निर्देशास, झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतूदींची पूर्तता करण्याच्या आधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३ ड सह कलम १२ (१) नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u> :-

१) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.१२/१०/२०२३ रोजीच्या पूर्वसूचना आदेशामधील सर्व शर्ती-अटी लागू राहतील या निर्देशासह सदर आदेश कायम करण्यात येत आहे.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

३) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास अशा प्रकरणी पात्रता धारण

केलेली असली तरीही असा झोपडीधारक, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

४) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्रात कोणासही कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता असे बांधकाम पाडणेत येईल.

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिध्दीनंतर उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करणे शक्य आहे.

**झोपडपट्टीचे नाव** - **स.नं.३१०/१, ३१०/२, सि.स.नं.४७५३, ४७५४ आणि ४७५५, आण्णासाहेब मगरनगर चिंचवड, पुणे**
**महानगरपालिका क्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

**अनुसूची**

| गाव- आण्णासाहेब मगरनगर, चिंचवड. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं. ३१०/१, ३१०/२, सि.स.नं.४७५३, ४७५४ आणि ४७५५ | महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | ६६००.०० चौ.मी. | लागू रस्ता | लागू सि.स.नं. ४७५६ पै. | पुणे मुंबई जुना रस्ता | सि.स.नं. ४७५५पै क्षेत्र |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक** :- १२/११ /२०२५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

१२/११/२५

**(सतीशकुमार खडके)**, (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- १. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी), पुणे - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- सदरचा झोपडपट्टी निर्मूलन आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.